# पटना पायरेट्सचा सलग दुसरा विजय! पुणेरी पलटनचा ११ गुणांनी पराभव

दिल्ली, १९ ऑक्टोबर २०२५: प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेत रविवारी झालेल्या तिसऱ्या सामन्यात पुणेरी पलटन आणि पटना पायरेट्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातही संघातील प्रमुख खेळाडूंना विश्रांती देण्यात आली होती. पटना पायरेट्सने हा सामना ३८- २७ च्या फरकाने जिंकला आहे. या सामन्यात पटना पायरेट्सकडून अयानने सर्वाधिक १७ गुणांची कमाई केली.

या सामन्यात सचिनने पुणेरी पलटनकडून पहिली चढाई केली. पहिल्याच चढाईत त्याने १ गुण घेत संघाचं खातं उघडलं. पूर्वार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दोन्ही संघ ४-४ ने बरोबरीत होते. सुरुवातीच्या १० मिनिटांमध्ये पटना पायरेट्सचा संघ आघाडीवर होता. पटना पायरेट्सने ८-५ गुणांसह ३ गुणांनी आघाडी घेतली.

पूर्वार्धातील १४ व्या मिनिटाला पुणेरी पलटनने ९-९ संघ गुणसंख्या बरोबरीत आणली. ही आघाडी शेवटपर्यंत कायम ठेवली. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ १५- १३ ने आघाडीवर होता.

उत्तरार्धातील चौथ्या मिनिटाला पटना पायरेट्सने गुणसंख्या ५-५ ने बरोबरीत आणली. पाचव्या मिनिटाला पुणेरी पलटनचा संघ ऑलआऊट झाला. यासह पटना पायरेट्सने १८-१६ गुणांसह २ गुणांनी आघाडी घेतली. पूर्वार्धातील ८ व्या मिनिटाला पटना पायरेट्सकडून अयानने आपलं सुपर १० पूर्ण केलं. उत्तरार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पटना पायरेट्सचा संघ २५- १९ गुणांसह ६ गुणांनी आघाडीवर होता.

उत्तरार्धातील दुसऱ्या टप्प्याच्या सुरूवातीलाच पुणेरी पलटनचा संघ पुन्हा एकदा ऑलआऊट झाला. यासह पटना पायरेट्सने २९-१९ गुणांसह १० गुणांची आघाडी घेतली. शेवटची ४ मिनिटे शिल्लक असताना पटना पायरेट्सचा संघ ३३-२२ गुणांसह ११ गुणांनी आघाडीवर होता. ४० मिनिटांच्या समाप्तीनंतर पटना पायरेट्सने हा सामना ३८-२७ च्या फरकाने आपल्या नावावर केला.